**पद्यपाठ ६**

**प्रार्थना- अनुपमा उजगरे**

**ठळक मुद्दे**

या कवितेच्या अभ्यासातून खालील घटक समजून घ्यायला मदत होईल-

१. ईश्वराकडे प्रार्थना करणा-या आईचे मनोगत

२. आईचे व्यक्तिमत्त्व

३. कवितेतील रूपकांचा अर्थ

**प्रस्तावना**

‘आई’ हा शब्द उच्चारताच तुमच्या मनात कोणकोणत्या भावना येतात ?का? विचार करताना तुमचा अनुभव आणि अनुपमा उजगरे यांनी व्यक्त केलेला अनुभव यात कोणते साम्य आढळते हे पाहण्यासाठी प्रथम कविता वाचा आणि ऐका. कवयित्रीने व्यक्त केलेल्या अनुभवाचे वेगळेपण शोधा.

कविता

तुझं अवघं आकाश
मी मागत नाही.
क्षितिज कवेत घेण्याइतका पैसा
मी मागत नाही.

पिलांचा पंखांत बळ येईपर्यंत
घरटं शाकारायला ह्या हातांना
आणि

घट्ट उभं राहायला ह्या पायांना
देता आलं तर बळ दे
बस, इतकंच दान दे.

**कवितेचा आशय-**

कवितेतील आई देवाला विनवणी करून मागणे मागत आहे. हे मागणे मागत असताना ती प्रार्थना करते. मला तुझ्याकडून आकाशाप्रमाणे भव्य,दिव्य असे काही नको आहे. म्हणजेच माझे मागणे छोटेच आहे. तुझी उदारता विशाल असली, तरी क्षितीज कवटाळण्याचे सामर्थ्य मला दे असे मला मागायचे नाही.

माझ्या मुलांच्या स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे बळ येईपर्यंत मला ताकद दे एवढेच आहे. ही ताकद हा संसार नेटकेपणाने चालवायला हातांना हवी आहे. तसेच आलेल्या परिस्थितीला समर्थपणे तोंड देण्यासाठी माझ्या पायांना सामर्थ्य दे. प्रार्थना करताना एवढीच शेवटी विनंती की हेच मला दान दे.

**कवितेचे सौंदर्य –**

कविता वाचताना काही वैशिष्ट्ये तुमच्या लक्षात आली असतील.

ह्या कवितेचे अल्पाक्षरत्व हेच सामर्थ्य आहे. म्हणजेच अत्यंत मोजक्या शब्दांत मोठा आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य या शब्दरचनेत आहे.उदा: ‘इतकंच’ या शब्दात बरेच काही ‘सामर्थ्य’ सामाविलेले आहे. त्यातून प्रार्थनेतील विनवणीही व्यक्त होते.

यामध्ये काही पारंपरिक संकल्पनांद्वारा कवयित्रीने आशयाची मांडणी केली आहे. जसे:

**पुढे चालू:**

<u>आकाश</u>**-** अत्यंत भव्य आणि सर्व जगाला व्यापणारा असा निसर्गातील एक घटक .इथे तुझ्याकडून सर्वच सामर्थ्याची मी अपेक्षा करत नाही हा भाव व्यक्त होतो.

<u>क्षितिज</u> – आकाश आणि जमिन  जिथे मिळतात अशी कल्पना केली जाते ती रेषा /जागा

<u>पंखात बळ येणे</u>**-** पाखरांच्या पंखात बळ आले की ती स्वावलंबी होऊन एकटी आपले जीवन जगू शकतात. दुस-या कुणाची मदत न घेता ती आपले जीवन जगतात. इथेही आई आपल्या मुलांना स्वावलंबी करण्याइतकेच बळ देवापाशी मागत आहे.

<u>दान</u> **–**आपल्याकडे दान म्हणजे आपल्याकडील दुस-या व्यक्तीला देणे. मग ते कोणत्याही स्वरूपाचे असेल. उदा. संपत्ती, ज्ञान,इ.

इथे विरोधाभास या अलंकाराचा मोठ्या खुबीने वापर झाला आहे.व्यापक. विशाल गोष्टींच्या पार्श्वभूमीवर मी एवढ मागत नाही अशी रचना आपली उत्सुकता वाढविते.

**उजळणी प्रश्न**

अ.  खालील प्रश्नांची उत्तरे ३० ते ४० शब्दांत लिहा.

१. या कवितेमधून 'आई' बद्दलची प्रतिमा अधिक का उंचावते?

२. या कवितेतील आईचे शब्दचित्र रेखाटा.

**मुक्त प्रश्न**

३.  तुमची आई तुमच्यासाठी कोणते दान मागेल असे तुम्हाला वाटते?

४. तुमच्या शाळेत 'मातृदिन' साजरा करण्यासाठी 'माझ्या आईविषयीच्या भावना' या विषयावर भाषण स्पर्धा आयोजित केली आहे. त्यासाठी भाषण तयार करा.

५. शाळेत 'मातृदिन' साजरा करण्यासाठी आणखीन कोणते कार्यक्रम सुचवाल?

६. तुमच्या पाठ्यपुस्तकात स्त्रियांबद्दलच्या तीन कविता आहेत. त्यावरून 'आजच्या स्त्रिया' या विषयावर १० ते १२ ओळींचा निबंध लिहा.